# Best wishes to all my student friends

by Narendra Modi 4. March 2010 01:00

मित्रांनो,

मार्च आला आणि परीक्षांचा मौसम चालू झाला. बोर्डाच्या परीक्षा चालू झाल्या आहेत आणि हा तर पालकांसाठी आणि मुलांसाठी अतिशय महत्त्वाचा दिवस.

माझ्या प्रिय मित्रांनो, राष्ट्राचे भविष्यातील आधारस्तंभ जे दहावी व बारावीच्या परीक्षांना बसत आहेत, मी त्या सर्वांना उत्तम यशासाठी शुभेच्छा देतो. प्रत्येक यश हे मूळात प्राप्त होते ते मेहनत, निर्धार आणि निष्ठेमुळे. आयुष्याच्या प्रवासात आपण जे शिकतो त्याची परीक्षा होत असते. आणि या अर्थी आपण सर्वच आयुष्याचे विद्यार्थी आहोत.

इथे मी स्वामी विवेकानंदांचे वाक्य उद्धृत करू इच्छितो,-"उठा, जागे व्हा आणि जोपर्यंत ध्येयप्राप्ती होत नाहीत तोपर्यंत थांबू नका."

परीक्षा हा तर या सगळ्या खेळाचा एक भाग आहे. सगळ्या चिंता मागे टाका आणि ज्ञानासाठी परीक्षा द्या. निकाला आपोआपच चांगला लागेल.

शेवटी, मी माझी यशाची गुरुकिल्ली तुम्हाला सांगू इच्छितो - "इच्छा + क्षमता = निर्धार. निर्धार + परिश्रम = यश"

मला खात्री आहे की तुमच्यापैकी प्रत्येकात क्षमता आहे आपल्या देशाचे भविष्य घडविण्याची. माझ्या सर्व विद्यार्थी मित्रांना शुभेच्छा!

तुमचा,



**Copyright © 2009 NarendraModi.com**